साप्ताहिक
# गोदावरी
परिवार

RNI Regd. No.: MAHMAR/1999/7490

सवलतीचा पोस्ट रजि.नं.-JAL/120/2022-24

* वर्ष २५ वे * अंक ४७ * सोमवार १८/११/२०२४ * डाक २०/११/२०२४ * पाने - ४ * किंमत २ रुपये
* year 25 * issue 47 * monday : 18 / 11 / 2024 * post Dt. 20/ 11 / 2024 * pages - 4 * price 2 Rs.




आपल्या 'डीपी'ला लावा
जळगाव - संविधानाने दिलेला अधिकार.. तुमचं मत, अमूल्य मत २० नोव्हेंबरला मतदान करा..!!

# नवजात शिशुच्या छातीत आतड्यांचा अडथळा

## बालरोग शल्यचिकीत्सकांकडून थोरॅकोस्कोपीची दुर्मिळ शस्त्रक्रिया

**जळगाव - जन्मत:च नवजात शिशुच्या छातीत आतडे शिरल्याने त्याच्या जीवाला धोका निर्माण झाला होता. मात्र डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय रूग्णालयातील तज्ज्ञ बालरोग शल्यचिकीत्सक डॉ. मिलींद जोशी यांनी थोरॅकोस्कोपीक सीडीएच रिडक्शन अँड रिपेअर ही दुर्मिळ शस्त्रक्रिया दुर्बिणीद्वारे करून शिशुचे प्राण वाचवले.**


रुग्णासमवेत तज्ञ डॉक्टर आणि त्यांची टीम छायाचित्रात दिसत आहे. (छायाचित्र : नितीन नेवे)

**दुर्मिळ अन् जोखमीची शस्त्रक्रिया यशस्वी**

**तज्ज्ञ बालरोग शल्यचिकीत्सक डॉ. मिलींद जोशी आणि त्यांच्या टीमने केलेली ही शस्त्रक्रिया अत्यंत दुर्मिळ आहे. ३० ते ३५ हजार नवजात शिशुंमधून अवघ्या तीन ते चार शिशुंना अशा प्रकारचा आजार होतो. तसेच यावरील शस्त्रक्रिया ही एकमेव डॉ. उल्हास पाटील रूग्णालयात योजनेंतर्गत मोफत केली जाते.**

नवजात शिशुच्या छातीत आतडे शिरल्याने त्याला श्वास घ्यायला त्रास होतो. तसेच ही परिस्थिती अधिक काळ राहिल्यास शिशुला कृत्रीम श्वासोच्छवास देण्याची वेळ येते. वेळीच या आजाराचे निदान आणि शस्त्रक्रिया न केल्यास शिशु दगावण्याची जोखीम असते. त्यामुळे शस्त्रक्रिया करणे आवश्यक असते. डॉ. उल्हास पाटील रूग्णालयात ही सुविधा उपलब्ध आहे.

**- डॉ. वैभव फरके**



याबाबत माहिती अशी की, अमोल सुतार यांच्या पत्नीची प्रसूती सामान्य रूग्णालयात झाल्यानंतर जन्मलेल्या नवजात शिशुच्या छातीत आतडे शिरल्याने त्याला श्वासोच्छवास घेता येत नव्हता. अशा परिस्थितीत या नवजात शिशुला डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय रूग्णालयात तातडीने उपचारासाठी हलविण्यात आले. डॉ. उल्हास पाटील रूग्णालयातील तज्ज्ञ बालरोग शल्यचिकीत्सक डॉ. मिलींद जोशी यांनी नवजात शिशुच्या छातीचा एक्स-रे केला. यात कन्जनायटल डायफ्रॉमॅटीक हर्निया असल्याचे निदान करण्यात आले. या आजारामुळे नवजात शिशुला श्वास घ्यायला त्रास होत होता. तसेच त्याच्या फुफ्फुसांची देखिल वाढ होत नव्हती. निदानानंतर नवजात शिशुवर शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेण्यात आला. सुतार यांची आर्थिक परिस्थिती बेताची असल्याने त्यांना रूग्णालयात उपलब्ध असलेल्या महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेचा लाभ मिळवून देण्यात आला. त्यानंतर नवजात शिशुवर दुर्बिणीद्वारे थोरॅस्कोपीक सीडीएच रिडक्शन अँड रिपेअर ही दुर्मिळ शस्त्रक्रिया करण्यात आली. योजनेंतर्गत ही शस्त्रक्रिया मोफत करण्यात आली.

**या शस्त्रक्रियेसाठी शस्त्रक्रिया विभागाचे विभागप्रमुख डॉ. शिवाजी सादुलवाड, डॉ. वैभव फरके, डॉ. ऋषीकेश कुळकर्णी, डॉ. आकांक्षा राजपूत, भूलशास्त्र तज्ज्ञ डॉ. सतीश पतीपती, डॉ. चैतन्य भोळे, डॉ. शितल फेगडे, डॉ. शिवाजी सोनोने यांचे सहकार्य लाभले.**

# बऱ्हाणपूरच्या रूग्णावर राइट फ्रन्टो टेम्पोरल क्रॅनिओटोमीची शस्त्रक्रिया

## डॉ. उल्हास पाटील रूग्णालयातील मेंदू व मणका विकार तज्ज्ञांना यश

**जळगाव - मध्यप्रदेशातील बऱ्हाणपूर येथील रूग्णाच्या राइट फ्रन्टल ग्लायोमा अर्थात ब्रेन ट्युमरवर डॉ. उल्हास पाटील रूग्णालयातील मेंदू व मणका विकार तज्ज्ञ डॉ. विपूल राठोड यांनी केलेली राइट फ्रन्टो टेम्पोरल क्रॅनिओटोमी शस्त्रक्रिया यशस्वी ठरली आहे. या शस्त्रक्रियेमुळे रूग्णाच्या शरीराची हालचाल आता पूर्ववत झाली आहे.**

याबाबत माहिती अशी की, बऱ्हाणपूर येथील खेमचंद मिसाळ (रा. बऱ्हाणपूर, वय ६८) यांना अचानक झटके येत होते. यात त्यांच्या डाव्या बाजूचा हात आणि पायात मोठी कमजोरी आल्याने त्यांच्या शरीराची हालचाल मंदावली होती. अशा परिस्थीतीत त्यांना डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय रूग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. याठिकाणी मेंदू व मणका विकार तज्ज्ञ डॉ. विपूल राठोड यांनी खेमचंद मिसाळ यांचा एमआरआय तपासणी केली. तपासणी अंती त्यांना राईट फ्रन्टल ग्लायोमा (ब्रेन ट्युमर) असल्याचे निदान करण्यात आले. निदानानंतर डॉ. राठोड यांनी शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेतला.

रूग्णाची आर्थिक परिस्थीती अत्यंत कमकुवत असल्याने त्याला आयुषमान भारत योजनेचा लाभ देण्यात आला. या योजनेंतर्गत खेमचंद मिसाळ यांच्यावर राईट फ्रन्टो टेम्पोरल क्रॅनीओटोमीची शस्त्रक्रिया करण्यात येऊन मेंदूतील गाठ काढण्यात आली. या गाठीची तपासणी केली असता ब्रेन ट्युमर असल्याचे शिक्कामोर्तब करण्यात आले.

वेळीच शस्त्रक्रिया करून ही गाठ काढण्यात आल्याने खेमचंद मिसाळ यांच्या शरीराची हालचाल आता पूर्ववत झाली आहे. अवघ्या तीन दिवसात त्यांच्या हाता पायाची ताकदही वाढली असून ते चालू लागले आहे. तब्बल चार तास ही शस्त्रक्रिया चालली.

**यांनी केली शस्त्रक्रिया**

**या शस्त्रक्रियेसाठी डॉ. अर्शिल शेख, डॉ. आशिष बावनकर, डॉ. सहर, डॉ. किरण जोगावडे, डॉ. श्वेता गाढवे, भूलशास्त्र तज्ज्ञ डॉ. चैतन्य भोळे, डॉ. सतीश पतीपती यांनी सहकार्य केले. आयुषमान भारत योजनेंतर्गत ही शस्त्रक्रिया मोफत करण्यात आल्याने खेमचंद मिसाळ यांनी डॉक्टरांचे ऋण व्यक्त केले.**



# हिमोफिलीयाग्रस्त बालकावर यशस्वी उपचार

## डॉ. उल्हास पाटील रूग्णालयातील बालरोग तज्ज्ञांना यश

**जळगाव - शहरातील एका तीन वर्षीय हिमोफिलीयाग्रस्त बालकावर डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय रूग्णालयाच्या बालरोग विभागात तज्ज्ञ डॉक्टरांनी केलेल्या उपचाराला यश आले आहे. योग्य निदान आणि उपचारामुळे बालकाची प्रकृती अगदी ठणठणीत झाली आहे.**

याबाबत माहिती अशी की, जळगाव शहरातील पिंप्राळा हुडको येथील गोकुळ भालेराव यांचा मुलगा आर्यन भालेराव (वय ३) याच्या ओठातून अचानक रक्तस्राव सुरू झाला होता. सुरूवातीला त्याला तातडीने स्थानिक डॉक्टरांकडे दाखविण्यात आले. त्यांनी लागलीच डॉ. उल्हास पाटील रूग्णालयात हलविण्याचा सल्ला दिला. गोकुळ भालेराव यांनी मुलगा आर्यन यास तातडीने डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय रूग्णालयाच्या पीआयसीसू विभागात उपचारासाठी दाखल केले. याठिकाणी बालरोग तज्ज्ञ डॉ. उमाकांत अणेकर यांनी बालकाची तपासणी केली. ओठातून होणाऱ्या अतिरक्तस्रावावर उपचार करण्यात आले. परंतु रक्तस्राव काही केल्या थांबेना. अखेर आर्यन याची फॅक्टर ८ आणि फॅक्टर ९ ची तपासणी करण्यात आली. तपासणीअंती हिमोफिलीया या आजाराचे निदान करण्यात आले. अतिरक्तस्रावामुळे आर्यनच्या शरीरातील रक्त अत्यंत कमी झाले होते. अशा परिस्थितीत त्याला चार रक्ताच्या पिशव्या लावण्यात आल्या. त्यानंतर त्याच्यावर आवश्यक ते तातडीचे उपचार करण्यात आले. अचूक निदान आणि योग्य उपचारामुळे आर्यन ह्याची प्रकृती धोक्याबाहेर येऊन त्याचा जीव वाचला. आर्यनवर महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेंतर्गत मोफत उपचार करण्यात आले. आर्यनची प्रकृती ठणठणीत झाल्याने त्याच्या कुटूंबियांनी डॉक्टरांचे आभार मानले. उपचारासाठी डॉ. कुशल धांडे, डॉ. ओमश्री गुडे, डॉ. चंदाराणी देगूलरकर, डॉ. भारती झोपे यांनी सहकार्य केले.



"सेंटर फॉर डिसीज कंट्रोल अँड प्रिव्हेन्शनच्या अहवालानुसार, हिमोफिलिया हा एक दुर्मिळ रक्त विकार आहे, ज्यामुळे रक्ताची व्यवस्थित गुठळी होत नाही, ते पातळ राहतं. रक्तातील प्रथिने गोठण्याच्या अनुपस्थितीमुळे असे घडते. या आजाराने ग्रस्त असलेल्या लोकांना दुखापत झाल्यास त्यांचे खूप रक्त वाहू शकते. या विकारामुळे शरीराच्या आत रक्तस्राव होऊ शकतो. हिमोफिलियामुळे गुडघे, घोटे आणि कोपरांमध्ये रक्तस्राव होऊ शकतो. अंतर्गत रक्तस्राव तुमच्या शरीरातील अवयव आणि ऊतींना नुकसान पोहोचवू शकतो आणि जीवघेणा ठरू शकतो. त्यामुळे या आजाराबाबत काळजी घेण्याची गरज आहे."

**- डॉ. ओमश्री गुडे, निवासी डॉक्टर.**



## संपादकीय

# ऑनलाईन आर्थिक हित

ऑनलाईन आर्थिक फसवणुकीचे प्रकार वाढतच आहेत. त्याला आळा घालण्याचा प्रयत्न सरकार कसोशीने करते. तथापि गुन्हेगार मात्र त्या सगळ्यावर मात करताना आढळतात. कदाचित तज्ज्ञही कल्पना करू शकणार नाहीत असे फसवणुकीचे नवनवे मार्ग शोधतात. डिजिटल अरेस्ट हा त्यापैकीच. याद्वारे मुंबईतील एका डॉक्टरला सात कोटींचा गंडा घातल्याचे वृत्त माध्यमात नुकतेच प्रसिद्ध झाले. डिजिटल अरेस्ट या प्रकारापासून सावध राहावे असे आवाहन पंतप्रधानांनी देखील नुकतेच केले. त्याचे टप्पे देखील लोकांना सांगितले. डिजिटल अरेस्ट हा शब्दही कदाचित अजून बहुसंख्यांना माहीत नसू शकेल. पण फसवणूक मात्र सुरु आहे. लोक ते समजून घेईपर्यंत गुन्हेगार कदाचित अजून एखादा मार्ग शोधतील. सरकारी पातळीवर असे गुन्हे रोखण्यासाठी सातत्याने संशोधन आणि प्रयत्न सुरु असतात. फसवणूक करणारे लाखो आयडी-सिमकार्ड सरकार बंद करते. बँक खाती गोठवते. यासाठी अनेक सरकारी संस्था कार्यरत असतात. तरीही फसवणूक होते. आर्थिक फसवणुकीला घाबरून सामान्यांचा मोबाईल आणि इंटरनेटचा वापर थांबवता येऊ शकेल का? आधुनिक तंत्रज्ञानाच्या जगात तसे करणे अव्यवहार्य ठरेल. कारण हातात मावणार्या मोबाईलमध्ये संपूर्ण जग सामावले आहे हे वास्तव आहे. त्यामुळे इंटरनेट साक्षरतेला पर्याय नाही. स्मार्ट मोबाईलचा वापर तर करायचा पण त्यातील फारसे काही कळत नाही असा पवित्रा घ्यायचा असा दुटप्पीपणा आता उपयोगाचा नाही. ऑनलाईन आर्थिक फसवणूक टाळण्याचे अत्यंत सोपे मार्ग तज्ज्ञ वारंवार सांगतात. पंतप्रधानांनी देखील डिजिटल अरेस्ट कशी टाळता येऊ शकेल हे सांगितले. ओटीपी, बँक आणि आर्थिक व्यवहाराची किंवा तुमची वैयक्तिक माहिती देऊ नका. कोणतीही सरकारी संस्था अशी माहिती फोनवरून विचारत नाही. शक्यतो अनोळखी क्रमांकावरून आलेले फोन उचलू नका हे काही कानमंत्र. तरीही लोक त्याच त्याच चुका करताना आढळतात. त्याचाच फायदा घेऊन गुन्हेगार लोकांना लुटतात. असे घडले तर नेमके काय करायचे हे देखील बहुसंख्यांना माहित नसते. तथापि याप्रकारची निरक्षरता किंवा तथाकथित भोळेपणा यापुढे उपयोगाचा नाही याची खूणगाठ लोकांनी मारलेली बरी. आर्थिक फसवणूक टाळायची असेल तर सामान्य माणसांना देखील शहाणे व्हावेच लागेल. तज्ज्ञ वेळोवेळी सुचवत असलेले फसवणूक टाळण्याचे मार्ग समजून घेऊन अंमलात आणण्याला पर्याय नाही. घटना घडून गेल्यानंतर काळजी करण्यात कोणताही शहाणपणा नसतो. त्यापेक्षा फसवणूक घडूच नये याची काळजी-दक्षता घेणे-सावधानता बाळगणे यातच सामान्यांचे ऑनलाईन आर्थिक हित दडले आहे.

# गुडघ्याचा संधीवात

**अ) गुडघ्याची संरचना :**

गुडघ्याच्या सांध्याची रचना ही मुख्यत्वे तीन हाडापासुन बनलेली असते. **१) फिमर :** मांडीचे हाड

**२) टिबीया :** पायाचे हाड

**३) पटेला :** गुडघ्यावरील वाटी या सर्व हाडांवर कार्टिलेजचे आवरण असते. हे आवरण पांढरे शुभ्र, मऊ व निसरडे असते. या कार्टिलेजवर एक द्रव असतो. त्यास सायनोव्हिअल फ्ल्युएड म्हणतात. हा द्रवपदार्थ कार्टिलेजचे पोषण व त्याचा गुळगुळीतपणा कायम ठेवण्यासाठी मदत करतो. या तीन्ही हाडांची हालचाल सुसंगत ठेवण्यासाठी सांध्यातील अंतर्गत अस्थिबंध (लिगामेंटस मदत करतात) गुडघ्याच्या आत दोन अस्थीबंध (एसीएल) व (पीसीएल) व बाहेर दोन अस्थिबंध असतात. याशिवाय सांध्यांमध्ये दोन गाद्या (मिनीस्कस) असतात, ज्या शॉक अब्जीर्बर म्हणुन काम करतात.




**ब) संधिवात :**

वाढत्या वयोमानानुसार सांध्यांच्या वापरामुळे व सांध्यातील द्रावाचे प्रमाण व त्याची गुणवत्ता कमी झाल्याने सांध्यावरील पुर्ण ताण हा सांध्यातील अस्थिबंध मिनीस्कस व कार्टिलेजवर पडतो. हा जोर सतत चालु राहील्याने वरील सर्व घटकांवर त्याचा दुष्परीणाम पडण्यास सुरवात होते. परीणामी त्यांचे घर्षण वाढुन गुडघ्यांची झिज होते. यालाच गुडघ्यांचा संधिवात म्हणतात.


**क) आजाराची लक्षणे :**

सांध्यात तीन आठवड्यापेक्षा जास्त वेदना असणे, तीन आठवड्यापेक्षा जास्त गुडघ्यावर सुज असणे, दिवसेंदिवस सांध्यांची हालचाल कमी होणे, मांडी व पायाच्या स्नायुंमध्ये अशक्तपणा व कमजोरी निर्माण होणे, सांध्यांमध्ये व्यंग निर्माण होणे अशी आजाराची लक्षणे आहेत.

**गुडघ्याच्या संधिवाताची प्रमुख कारणे :**



वाढते वय (४० पेक्षा जास्त), लठ्ठपणा (बॉडी मास इंडेक्स २५ व अधिक), स्नायुबंधाची इजा/ गादी फाटणे, खेळाडु, सांध्यांच्या इतर आजारांमुळे प्रभावित



होऊन संधीवात निर्माण होणे. जसे : रूमॅटॉईड आर्थायढीस सिरोनिगेटिव्ह आर्थो पॅथी, लुज बॉडीज, हाडाचे जुने फ्रॅक्चर, सिकलसेल, हिमोफेलीया, जुना मार, कॅल्शीयम, व्हीटॅमीन डीची कमतरता, मुडदुस सारखे आजार, गुडघ्याचा जंतुसंसर्ग इन्फेक्शन, स्टिरॉईडचा अयोग्य वापर.

**टोटल हिप खुबा बदल, तसेच टोटल क्नी, गुडघा बदल या शस्त्रक्रिया डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजने अंतर्गत मोफत होतात.**

**चाचण्या /तपासण्या :**

क्ष-किरण (एक्स-रे)तपासणी उभे राहुन दोन्ही गुडघ्यांचा एक्स-रे केल्यानंतर त्यात खालील बदल दिसल्यास संधिवाताचे निदान होते. सांध्यातील दोन हाडातील अंतर कमी होते/दिसते, सांध्यांच्या हाडातील किनाऱ्यावर ऑस्टीओफाईट्स दिसुन येतात, हाडाची घनता कमी दिसुन येते, सांध्यांमध्ये व्यंग दिसुन येते.



**डॉ. दिपक अग्रवाल**
अस्थिरोग तज्ञ, डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय,जळगाव

**ड)उपचार :-**

**१) संधिवात कसा टाळावा :** वजन कमी करावे, पायऱ्यांची चढ-उतार टाळावी, जमिनीवर मांडी घालुन बसणे टाळावे, शक्यतोवर खुर्चीचा वापर करावा, पाश्चात्य पध्दतीच्या शौचालयाचा वापर करावा, संतुलित आहार घ्यावा.

**२) प्राथमिक अवस्थेतील संधिवातावर उपचार :**

ए) औषधे : वेदनाशामक गोळ्या डॉक्टरांच्या सल्ल्याने घेतल्यास फरक पडतो
बी) सांध्यातील द्रव्याचे सबस्टीट्युटचे इंजेक्शन घेणे,
सी) सांध्यातील अस्थिबंधाचे दुर्बिणीद्वारे पुनर्रचना व दुरूस्ती करणे
डी) सांध्यातील लुज बॉडीज दुर्बिणीद्वारे काढुन घेणे
ई) हाय टिबीयल ऑस्टीओटॉमी

**३) अंतीम अवस्थेतील संधिवाताच्या आजारावरील उपचार :**

ए) युनिकॉडीलास नी रिप्लेसमेंट सर्जरी (युकेआर) (गुडघ्याची अंशतः कृत्रीम सांधारोपण शस्त्रक्रिया)

बी) टोटल नी रिप्लेसमेंट सर्जरी (टिकेआर) गुडघ्याची संपुर्ण कृत्रीम सांधारोपण शस्त्रक्रिया या शस्त्रक्रियेमध्ये सांध्यातील पृष्ठभाग बदलुन कृत्रीम पृष्ठभाग टाकले जातात.

**शस्त्रक्रियेचे फायदे :** सांद्यातील वेदना कमी होतात. सांध्यांची हालचाल पुर्ववत होते, पायऱ्या चढणे, मांडी घालुन बसणे सहज शक्य होते.

**४) नी ऑर्थोडेसीस :** या शस्त्रक्रियेमध्ये वेदना कमी होतात. परंतु सांध्यांची हालचाल होत नाही.

# मोताळा येथे ५१ दात्यांचे रक्तदान

**मोताळा - लोहपुरुष. सरदार वल्लभाई पटेल यांच्या १५० व्या जयंती निमित्त लेवा भातृ मंडळ मोताळा, जिल्हा बुलढाणा येथे, आयोजित भव्य रक्तदान शिबीरात ५१ रक्तदात्यानी केले.**



रक्तदान सर्वात प्रथम प्रतिमा पूजन करून रक्तदान शिबीरास सुरवात करण्यात आली.. लेवा भातृ मंडळ अध्यक्ष. आदरणीय दिलीपदादा नाफडे.. उपाध्यक्ष एकनाथराव खर्चे, सचिव. गजानन टेकाडे,कोषअध्यक्ष. श्रीकुष्ण किंणगे, सर्व सदस्य व समजबाधव मोताळा जि.बुलढाणा आयोजित शिबिरात उत्कृष्ट प्रतिसाद दिला. यशस्वीतेसाठी गोदावरी फाउंडेशन डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय रक्तपेढीचे डॉ. नितीन भारंबे, रक्तपेढी समन्वयक लक्ष्मण पाटील, टेक्निसियन संय्यद शेख, यश पाटील, भावेश शेळके यांनी परिश्रम घेतले.

# स्टॅक हॅक हॅकेथॉन स्पर्धेत गोदावरी अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांचे यश



**जळगाव - नितीन पाटील, शुभम संदानशिव, मृणाली सपकाळे, अभय घोंगडे यांनी संगणक अभियांत्रिकीतून मर्सर आयोजित स्टॅक हॅक हॅकेथॉनमध्ये १२ वा क्रमांक मिळवला.**

डॉ.विजयकुमार पाटील प्राचार्य, प्रा.प्रवीण फालक उपप्राचार्य यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. डॉ विजयकुमार वानखेडे प्रशिक्षण आणि प्लेसमेंट अधिकारी, प्रा. नीलेश वाणी एचओडी संगणक विभाग, प्रा. नीलेश चौधरी डीन परीक्षा, प्रा. वेलचंद होले टी अँड पी समन्वयक, प्रा. प्रशांत शिंपी, प्रा. भावना झांबरे आणि प्रा. शिरीन पिंजारी इ उपस्थीत होते.

# गोदावरी अभियांत्रिकीत विभागीय स्तरावरील आविष्कार स्पर्धा उत्साहात

**जळगाव - विद्यार्थ्यांमध्ये संशोधन करण्याची आवड निर्माण व्हावी यासाठी विद्यापीठाच्या मार्गदर्शनाखाली गोदावरी अभियांत्रिकी महाविद्यालयात अविष्कार २०२५ विभागीय स्तरावर आयोजन करण्यात आले.२००६ पासून ही स्पर्धा सूरू असून डॉ. ाबासाहे आंबेडकर टेक्नॉलॉजिकल युनिव्हर्सिटी, लोणेरे अंतर्गत विदर्भ, छत्रपती संभाजी नगर (औरंगाबाद), नाशिक/ जळगाव, लातूर/नांदेड,सोलापूर/पुणे व कोल्हापूर या झोन्सचा समावेश आहे.**



याप्रसंगी प्रमुख पाहुणे श्री सुभाष पाटील (चेअरमन, मास्टेक कंट्रोल्स)यांच्यासोबत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजयकुमार पाटील, डॉ.राजकुमार शिरसाम (निरीक्षक, केमिकल टेक्नॉलॉजी, नॉर्थ महाराष्ट्र युनिव्हर्सिटी), प्रा. रोशन बोंडे (निरीक्षक, डॉ. बाबासाहे ओंडकर टेक्नॉलॉजिकल युनिव्हर्सिटी), डॉ. जगदीश जाधव (आरसीपीआयटी शिरपूर) उपस्थित होते. सुरुवातीला सरस्वती पूजन व दीप प्रज्वलन करण्यात आले. मान्यवरांचे पुष्पगुच्छ शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. प्रस्ताविकात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजयकुमार पाटील यांनी इनोवेशन, इन्वेंशन, स्टार्टअप आणि इंक्युबेशन ही आजच्या काळाची गरज आहे व त्या अनुषंगाने प्रत्येक विद्यार्थ्याने काम करणे गरजेचे आहे. सहभागी स्पर्धकांना त्यांच्या पोस्टर प्रेसेंटेशन साठी शुभेच्छा दिल्या. डॉ. राजकुमार शिरसाम यांनी कटिंग एज टेक्नॉलॉजी संदर्भात माहिती देवून अशा स्पर्धांमधूनच विद्यार्थ्यांमध्ये प्रगल्भता निर्माण होते असे त्यांनी नमूद केले.प्रमुख पाहुणे श्री. सुभाष पाटील यांनी विद्यार्थ्यांना आगामी काळात नावारूपाला येणाऱ्या टेक्नॉलॉजी तसेच यासाठी संशोधनाला वाव असल्याचे सांगत सहभागी स्पर्धकांना सादरीकरणासाठी शुभेच्छा दिल्या. स्पर्धा कॉमर्स मॅनेजमेंट लॉ, प्युअर सायन्स, एग्रीकल्चर निमल हसंडरी, इंजीनियरिंग अँड टेक्नॉलॉजी, मेडिसिन फार्मसी, ह्युमेनिटी लैंग्वेज फाईन आर्ट या सहा कॅटेगिरीच्या माध्यमातून स्पर्धा घेण्यात आली.


या स्पर्धांमध्ये विजयी झालेल्या सहाही पदवी आणि पदव्युत्तर विभागतील स्पर्धकांना प्रत्येकी सुवर्ण, रजत आणि कास्य पदक मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. विद्यापीठाकडून १२ पर्यवेक्षक तसेच १ निरीक्षक यांची नेमणूक करण्यात आलेली होती.सदर यशस्वी आयोजनाबद्दल गोदावरी फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. उल्हास पाटील, डॉ. वर्षा पाटील (सचिव), डॉ. केतकी पाटील (सदस्य) व डॉ. वैभव पाटील (डीएम कार्डिओलॉजी)✻ यांनी कौतुक केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजयकुमार पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे समन्वयक विद्युत विभागाचे प्रा. नेमीचंद सैनी, प्रा. जयश्री पाटील, सर्व विभाग प्रमुख, प्राध्यापक वर्ग तसेच कमिटी मेंबर योनी परिश्रम घेतले. उद्घाटन प्रसंगी सूत्रसंचालन महाविद्यालयातील विद्यार्थिनी तुळजा महाजन व निलक्षी बर्डे व समारोपप्रसंगी हेमांगी बाबा व श्रुती सोनार या विद्यार्थिनींनी केले तसेच आभार प्रदर्शन प्राध्यापक नेमीचंद सैनी(अविष्कार समन्वयक) यांनी मानले.

Editor : Subhash Patil (Reg. Newspaper) Weekly Godavari Parivar : Owner, Publisher, Printer : Dr. Mrs. Varsha Patil printed at Subhash Printers, 38, Trimbak Nagar, Near Shakuntala Rane Primary School, Beside Narayani Park Apartment, Mahabal Area, Jalgaon 425002 (Mah.) Godavari Hospital, Released at Jalgaon, Near Bhaskar Market. Phone no. 2221834/35, should be sent to this email for publication of news in the issue (Editors do not necessarily agree with the views published in the issue.)

संपादक : सुभाष पाटील (रजि. न्युजपेपर) साप्ताहिक गोदावरी परिवार : मालक, प्रकाशक, मुद्रक : डॉ. सौ. वर्षा पाटील यांनी सुभाष प्रिंटर्स, ३८, त्र्यंबक नगर, शकुंतला राणे प्रायमरी स्कूलजवळ, नारायणी पार्क अपार्टमेंट शेजारी, महाबळ एरिया, जळगांव ४२५००२ (महा.) येथे छापून गोदावरी हॉस्पीटल, भास्कर मार्केट जवळ, जळगांव येथे प्रसिद्ध केले. फोन नं. २२२१८३४/३५, अंकात बातम्या प्रसिध्द करण्यासाठी या ईमेलवर पाठवाव्यात Email : godavari.parivar@gmail.com (अंकात प्रकाशित झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

# विद्यार्थ्यांनो फेरारी घेण्याचे स्वप्न उराशी बाळगा : डॉ.उल्हास पाटील

## वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांचा 'डीन ॲड्रेस' समारोह




**जळगाव – डॉ. उल्हास पाटील महाविद्यालयात वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षात प्रवेश घेतलेले विद्यार्थी भाग्यशाली आहेत. कारण महाविद्यालयात विद्यार्थ्यांना शैक्षणिक ज्ञान प्राप्तीसाठी आवश्यक त्या सर्व प्रकारच्या सुविधा ह्या ठिकाणी उपलब्ध आहेत. विद्यार्थ्यांनी प्रचंड अभ्यास, कठोर परिश्रम आणि संशोधन वृत्ती कायम ठेवत शक्तीशाली चिकीत्सक व्हावे असा कानमंत्र संस्थेचे चेअरमन माजी खा. डॉ. उल्हास पाटील यांनी शुक्रवारी आयोजित डीन ॲड्रेस समारंभात दिला.**

डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालयात प्रथम वर्ष एमबीबीएससाठी प्रवेश घेतल्या विद्यार्थ्यांकरीता डीन ॲड्रेस समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. व्यासपीठावर महाविद्यालयाचे डीन डॉ. प्रशांत सोळंके, वैद्यकीय अधीक्षक डॉ. प्रेमकुमार पंडीत, विभागप्रमुख डॉ. अमृत महाजन, बालरोग विभाग प्रमुख डॉ. अनंत बेंडाळे, मेडीसीन विभागाचे डॉ. चंद्रय्या कांते, डॉ. सी.डी. सारंग, अस्थिरोग विभाग प्रमुख डॉ. दीपक अग्रवाल, नाक–कान–घसा विभागप्रमुक डॉ. अनुश्री अग्रवाल, भूलशास्त्र विभागप्रमुख डॉ. देवेंद्र चौधरी, शल्यचिकीत्सा विभागाचे प्रमुख डॉ. शिवाजी सादुलवाड उपस्थित होते. समारंभाच्या सुरूवातीला डीन डॉ. प्रशांत सोळंके यांनी वैद्यकीय महाविद्यालयात नव्याने प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयातील होस्टेल, मेस, मैदान, लायब्ररी, विविध खेळ विषयक माहिती दिली. तसेच डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय हे एकमेव अशी संस्था आहे ज्याठिकाणी प्रत्येक विद्यार्थ्याच्या प्रगतीबाबत काळजी घेतली जाते. विद्यार्थ्यांनी वैद्यकीय महाविद्यालयातील सुविधांचा लाभ घेण्यासोबत पालकांच्या चेहऱ्यावर यशाचा आनंद झळकवावा असे आवाहन त्यांनी केले.

अध्यक्षीय मार्गदर्शनात चेअरमन डॉ. उल्हास पाटील यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांनी संगीत आणि वैद्यकीय क्षेत्र याठिकाणी असलेल्या गुरू आणि शिक्षकांचा सन्मान ठेवावा. कारण पुढील पाच वर्ष ते तुमच्यासाठी महत्वाची भूमिका बजावणार आहेत. डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालयात १० विद्यार्थ्यांसाठी एक शव उपलब्ध करून दिले आहे, जे राज्यात कुठेही नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांनी विच्छेदन प्रक्रिया समजून घेत संशोधन वृत्ती जोपासली पाहीजे. विद्यार्थ्यांनी वैद्यकीय महाविद्यालयात अभ्यासासोबत होणाऱ्या प्रत्येक उपक्रमात सहभागी होऊन अष्टपैलू व्हावे. शक्तीशाली चिकीत्सक होण्यासाठी दररोज अभ्यासात सातत्य ठेवा, लायब्ररीत तासन् तास पाठांतर करा, आपला गणवेश स्वच्छ आणि निटनेटका ठेवा, या महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या २०० विद्यार्थ्यांनी मास्टरमाइंड होत फेरारी कार घेण्याचे स्वप्न उराशी बाळगावे असे आवाहनही डॉ. उल्हास पाटील यांनी केले.

**यांची होती उपस्थिती**

याप्रसंगी कार्यक्रमाला वैद्यकीय महाविद्यालयाचे रजीस्ट्रार प्रमोद भिरूड, डॉ. नीलेश बेंडाळे, डॉ. जमीर खान, डॉ. रासिका सक्सेना, डॉ. पूनम टेंगनकई, डॉ. प्रिती सोळंके, डॉ. गायत्री पाटील, डॉ. आयुष महाजन, लॅब विभागाचे प्रमुख डॉ. शिरीष गोंडाणे यांच्यासह प्राध्यापक व प्रशासन विभागाचे अनंत इंगळे, पंकज राणे, ललित बोंडे, अमोल बोंडे, मिलींद सरोदे, नंदू शेळके, तनुजा भिरूड, भावना अत्तरदे उपस्थित होते.

**यांनी घेतले परिश्रम**

यशस्वीतेसाठी गजानन जाधव, गोपाल नांदुरकर, परेश बोरोले, रोशन महाजन, राजेंद्र धांडे, वंदना पाटील, सुवर्णा बोरोले, नीलेश धांडे, राजू राणे, विकास पाटील, रितेश बोरोले यांनी परिश्रम घेतले.

## केरळी महिला ट्रस्टच्या कार्तिकस्वामी मंदिरात कार्तिकी पौर्णिमेचे वेध नवचंडी याग संपन्न

**जळगाव – येथील निवृत्तनगरमधील केरळी महिला ट्रस्ट संचलित कार्तिक स्वामी मंदिरात कार्तिकी पौर्णिमेचे वेध लागले असून आज नवग्रह मंदिरात आज नवचंडी याग भक्तीभावात संपन्न झाला.**

नवचंडी पूजा विधी दरम्यान देवीच्या नऊ रूपांची पूजा केली जाते. नवचंडी यज्ञ हा एक उपासना प्रकार आहे हा यज्ञ शत्रू आणि अशुभ ग्रहांचे परिणाम नाहीसे करतो. या यज्ञाला शरण जाऊन मनुष्य यश मिळवू शकतो. त्यातून मोक्षही मिळतो. याशिवाय अशुभ ग्रहांचे सर्व प्रकारचे वाईट प्रभाव दूर



करते. तसेच या उपासनेतून मन, शरीर आणि आत्मा यांची शुद्धता येते. ते आत्मा शुद्ध करते आणि शांत करते. वेदांच्या घोषात भक्तिभावात हा नवचंडी याग संपन्न झाला.या वेळी केरळी महिला ट्रस्ट पधधिकारि,सदस्य आणि परिसरातील नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## गोदावरी अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांची निवड



**जळगाव – गणेशराज पाटील, कुणाल बागुल, रुषिकेश पाटील, संध्या ब्राम्हणे या गोदावरी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, जळगावच्या चार विद्यार्थ्यांची अहिराणी भाषा प्रशिक्षण प्रकल्पावर इंटर्नशिपसाठी (प्रोजेक्ट) निवड झाली आहे.**

मशीन लर्निंग, डीप लर्निंग. सीडॅक, सायन्स सोसा,ऑफ मेटवाय भारत सरकार येथे त्यांचा सत्कार झाला. डॉ. विजयकुमार पाटील प्राचार्य, प्रा. प्रवीण फालक उपप्राचार्य. डॉ.विजयकुमार वानखेडे ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर, प्रा.निलेश वाणी एचओडी कॉम्प्युटर विभाग, प्रा.निलेश चौधरी डीन परीक्षा, प्रा.वेलचंद होले टी अँड पी समन्वयक, प्रा.प्रशांत शिंपी, प्रा. देवेंद्र फेगडे, प्रा.भावना झांबरे आणि प्रा. शिरीन पिंजारी आदी याप्रसंगी उपस्थित होते.

## डॉ.उल्हास पाटील होमिओपॅथिक मेडिकल कॉलेजला नॅक मानांकन

**जळगाव – वैद्यकिय क्षैत्रातील शिक्षण व करिअर साठी विद्यार्थ्यांना उत्कृष्ठ रित्या मार्गदर्शन करणाऱ्या गोदावरी फाउंडेशनचे डॉ. उल्हास पाटील होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज आणि हॉस्पिटल राष्ट्रीय मूल्यांकन परिषद (नॅक) Zo r प्लस मुल्यांकन दिले आहे. ही बा महाविद्यालयाच्या प्रगतीत गौरवास्पद आहे.**

महाविद्यालय हे पहिल्यादांच नॅक च्या पहिल्या सायकल मध्ये गेले असून बी प्लस श्रेणी मिळवून यशस्वी ठरले आहे. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व गुणवत्तापूर्ण शिक्षण सामाजिक दृष्ट्या संवेदनशील असावे हे संस्थेचे चेअरमन डॉ. उल्हास पाटील यांचे ध्येय आहे. डॉ. उल्हास पाटील होमीओपॅथी महाविद्यालयाने अनेक नामवंत वैद्यकिय तज्ञ व विद्यार्थी घडवले आहे. नुकतीच नॅकच्या चमूकडून डॉ. उल्हास पाटील होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज आणि हॉस्पिटलचे निरीक्षण करण्यात आले. चमूने येथील उपचाराची सुविधा, अद्ययावत यंत्रसामुग्री, विद्यार्थ्यांसाठीचे वर्ग व ऑनलाईन वर्गाला तंत्रज्ञानाची दिलेली जोड, संशोधनाला दिलेला वाव बघत सकारात्मक अहवाल दिला. त्यात संस्था बी+ ग्रेडवर सात पॉइंट स्केलवर २.६९ च्या सीजीपी सह ५ वर्षांच्या कालावधीसाठी वैध आहे. संस्थेच्या यशाबद्दल संस्थेचे चेअरमन डॉ. उल्हास पाटील, श्री सुभाष पाटील, डॉ. वर्षा पाटील, डॉ. केतकी पाटील, डॉ. वैभव पाटील, प्राचार्य, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी ,पालक माजी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.



**डॉ. प्रेमचंद पंडित**
(९४२२९१५३७९)
(निवृत्त सिव्हील सर्जन, बुलडाणा)
वैद्यकीय अधीक्षक
डॉ.उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालय, जळगाव

प्रेमवाणी

1. *Learn something new as you work towards choosing to excel despite the level of difficulty.*
– ❋कठिनाई के स्तर के बावजूद उत्कृष्टता चुनने की दिशा में काम करते समय कुछ नया सीखें।❋
1. *Instill a pioneer mentality.*
– ❋एक अग्रणी मानसिकता विकसित करें।❋
2. *Have enthusiastic feelings that lead to creativity.*
– ❋उत्साही भावनाएं रखें जो रचनात्मकता की ओर ले जाएं।❋

## डॉ.उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालयातील २०० विद्यार्थ्यांनी घेतली शपथ

**जळगाव – येथील डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालयात कॅडेव्हरीक ओथ अर्थात शवविच्छेदना पूर्वीची शपथ घेण्यात आली. यावेळी २०० विद्यार्थ्यांनी ही शपथ ग्रहण केली.**

डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालयात वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांना डॉ. पूनम यांनी शवविच्छेदनापूर्वीची शपथ दिली. यावेळी २०० विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालयात प्रत्येक १० विद्यार्थ्यांसाठी एक शव अभ्यासासाठी उपलब्ध करून दिले जाते. डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालयाचे रजीस्ट्रार प्रमोद भिरूड यांच्या सहकार्यामुळे विद्यार्थ्यांना अशी सुविधा उपलब्ध करून देणारे हे एकमेव महाविद्यालय आहे.

यावेळी विभागप्रमुख डॉ. अमृत महाजन, डॉ. शुभांगी घुले यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी डॉ. तुषार पाटील, डॉ. जमीर, डॉ. पूनम, डॉ. प्रिती साळुंके, डॉ. रघुराज यादव यांच्यासह कर्मचारी गजानन जाधव, गोपाल नांदुरकर, रोशन महाजन, राजू धांडे, गुणवंत कोल्हे आदी उपस्थित होते.



# हिपॅटिककोमात गेलेल्या बालकाचे वाचले प्राण

## डॉ. उल्हास पाटील रूग्णालयातील बालरोग तज्ज्ञांचे अथक प्रयत्न

**जळगाव – शरीरात असलेला कावीळ आणि त्यात अंगात येणारे झटके यामुळे हिपॅटीक कोमात गेलेल्या बालकावर डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय रूग्णालयातील पीआयसीयू विभागातील बालरोग तज्ज्ञांकडून वेळीच उपचार झाल्याने त्याचे प्राण वाचले.**



याबाबत सविस्तर माहिती अशी की, धरणगाव तालुक्यातील सोनवद येथील शुभम अहिरे (वय १२) याला काही दिवसांपूर्वी अन्न पचत नव्हते. त्याचे अंग, डोळे देखिल पिवळे पडले होते. त्याच्या कुटूंबियांनी स्थानिक ठिकाणी दाखविले असता त्याच्या शरीरात काविळचे प्रमाण प्रचंड वाढले होते. अशा परिस्थितीत त्याला जळगावला उपचारासाठी हलविण्याचा सल्ला देण्यात आला. शुभम याची प्रकृती चिंताजनक झाल्याने त्याला तातडीने डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय रूग्णालयाच्या पीआयसीयू अर्थात बालरोग विभागात दाखल करण्यात आले. यावेळी शुभम हा बेशुध्दावस्थेत होता. त्यामुळे बालरोग तज्ज्ञ डॉ. उमाकांत अणेकर यांच्यासह डॉ. कुशल धांडे, डॉ. चंदाराणी देगूलरकर, डॉ. ओमश्री गुडे यांनी त्याची तपासणी केली. त्याच्या शरीरातील काविळ वाढल्याने त्याचे संपूर्ण अगं हे हळदीसारखे पिवळे पडले होते. त्याच्यावर तातडीने उपचार सुरू करण्यात आले. दरम्यान उपचारावेळीच त्याला झटके येऊन तो हिपॅटिक कोमात गेला. तसेच त्याला पॅपीलीडीमा म्हणजेच डोळ्यांनी दोन–दोन दिसत होते. प्रसंगावधान ओळखून बालरोग तज्ज्ञ डॉ. अणेकर आणि त्यांच्या टीमने प्रभावी उपचाराला सुरूवात केली.तसेच नेत्ररोग तज्ज्ञांकडूनही त्याच्यावर उपचार करण्यात आले.

दुसऱ्याच दिवशी त्याला येणारे झटके बंद झाले. त्यानंतर पाचव्या दिवसापासून त्याच्या शरीरातील काविळचे प्रमाणही कमीकमी होत गेले. अवघ्या दहा दिवसात त्याच्या प्रकृतीत झपाट्याने सुधारणा झाली आणि त्याचे प्राण वाचले. शुभम याच्यावर महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेंतर्गत मोफत उपचार करण्यात आले.

**काविळचे प्रमाण अधिक वाढल्याने एखादी व्यक्ती ही हिपॅटीक कोमामध्ये जाऊ शकते. अशा परिस्थितीत रूग्णाच्या आजाराचे अचूक निदान होणे आवश्यक असते. यात वेळ आणि योग्य उपचार हे दोन्ही महत्वाची भूमिका बजावतात. अन्यथा रूग्णाचा जीवाला मोठा धोका उद्‌भवू शकतो. डॉ. उल्हास पाटील रूग्णालयात यावर खात्रीशीर उपचार उपलब्ध आहेत.**



**–डॉ. चंदाराणी देगूलरकर**
**निवासी डॉक्टर**

# नऊ वर्षापासून मानसिक विकाराने त्रस्त असलेल्या रूग्णावर उपचार

## डॉ. उल्हास पाटील रूग्णालयाच्या मानसोपचार विभागाचे यश



**जळगाव – तब्बल नऊ वर्षांपासून मानसिक विकाराने त्रस्त असलेल्या रूग्णावर डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय रूग्णालयाच्या मानसोपचार तज्ज्ञांनी केलेल्या उपचाराला यश आले असून रूग्ण मानसिक विकारमुक्त झाला आहे.**

याबाबत माहिती अशी की, यावल तालुक्यातील सांगवी बु. येथील पंडीत धांडे (वय ६८) यांना काही कौटुंबिक आघातांमुळे मानसिक विकार जडला होता. सात ते आठ ठिकाणी दाखवून देखिल त्यांच्या वागण्यात बदल होत नव्हता. त्यांना वारंवार भिती वाटायची, कानात आवाज येत होते, तसेच अचानक घरातूनही ते कुणाला काहीही न सांगता निघून जात होते. अनेकदा स्वत:शीच बडबड देखिल ते करत होते.अशा परिस्थितीत त्यांना डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय रूग्णालयाच्या मानसोपचार विभागात उपचारासाठी भरती करण्यात आले. याठिकाणी मानसोपचार विभागातील तज्ज्ञ डॉ. विलास चव्हाण यांनी त्यांच्या आवश्यक त्या तपासण्या केल्या. तपासणीअंती त्यांना उपचारासाठी भरती करून घेण्यात आला. दरम्यानच्या काळात त्यांच्यावर औषधोपचारासह त्यांचे समुपदेशन देखिल करण्यात आले.

निदानामुळे योग्य उपचार आणि समुपदेशनाने रूग्णाच्या प्रकृतीत झपाट्याने सुधारणा झाली. त्यांची रूग्णालयातून सुटी करण्यात आली. तसेच त्यांना औषधोपचारासंबंधी मार्गदर्शन देखिल करण्यात आले. उपचारासाठी डॉ. आदित्य जैन, डॉ. उमा चांदूरकर, डॉ. हिमांशू जाधव, डॉ. सौरभ भूतांगे यांनी सहकार्य केले.

**“ कुणीतरी आपल्याला मारायला येतय, मनातील भिती, स्वत:शीच बडबड करणे, अचानक घरातून निघून जाणे, एकटे राहणे, भूक न लागणे ही सारी मानसिक विकाराची लक्षणे आहेत. अशा प्रकारची लक्षणे आढळून आल्यास त्वरीत डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय रूग्णालयाच्या मानसोपचार विभागात संपर्क साधावा. या मानसोपचार विभागात रूग्णावर औषधोपचारासह त्यांचे समुपदेशन देखिल केले जाते. तसेच याठिकाणी मानसोपचार तज्ज्ञांची टीम देखिल उपलब्ध आहे. ”**



**– डॉ. हिमांशू जाधव**

# डॉ.उल्हास पाटील रूग्णालयात महिनाभरात ३८ एन्जीओप्लास्टी यशस्वी

**जळगाव – येथील डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय रूग्णालयाच्या हृदयालयात गत महिनाभरात ३८ रूग्णांवर एन्जीओप्लास्टी शस्त्रक्रिया यशस्वी करण्यात आल्या आहेत.**




डॉ. उल्हास पाटील वैद्यकीय रूग्णालयाच्या हृदयालयात हृदयविकार असलेल्या रूग्णांसाठी महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेंतर्गत मोफत एन्जीओप्लास्टीची केल्या जातात. तसेच बायपास आणि पेसमेकरचीही सुविधा हृदयालयात उपलब्ध आहे. गत ऑक्टोबर महिन्यात हृदयालयात ८० जणांची एन्जीओग्राफीची तपासणी करण्यात आली. यापैकी ३८ रूग्णांच्या हृदयाला रक्तपुरवठा करणाऱ्या धमन्यांमध्ये ब्लॉकेज आढळून आले होते. या सर्व रूग्णांना रूग्णालयात उपलब्ध असलेल्या महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेचा लाभ देऊन त्यांच्यावर मोफत शस्त्रक्रिया करण्यात आली. यासोबतच डॉ. उल्हास पाटील रूग्णालयाच्या हृदयालयात व्हेरीकोज व्हेन्सवर देखिल मोफत उपचाराची सुविधा उपलब्ध झाली आहे. तरी गरजू रूग्णांनी या सेवेचा लाभ घ्यावा असे आवाहन डॉ. उल्हास पाटील रूग्णालयातर्फे करण्यात आले आहे.

# हिवाळ्यात कानदुखीकडे दुर्लक्ष नको

हिवाळ्यात कान दुखण्याची समस्या असेल तर त्याकडे दुर्लक्ष करू नका. कधीकधी कान दुखण्याचे कारण सामान्य असू शकतं आणि ते थंडीमुळे असू शकतं. त्याच वेळी, काही प्रकरणांमध्ये कानदुखी काही गंभीर आजाराचे लक्षण देखील असू शकते.

**या कारणांमुळे कानात वेदना होतात**

कानदुखी जिवाणू किंवा विषाणू संसर्गामुळे होऊ शकते. यामुळे, तुम्हाला ताप, उलट्या आणि चक्कर येण्याची समस्या असू शकते.थंडीमुळे कानात तीव्र वेदनाही होऊ शकतात.जर तुम्हाला हिवाळ्यात थंडीची समस्या असेल आणि ही स्थिती दीर्घकाळ राहिल्यास कानात दुखणे देखील सुरू होऊ शकते. सर्दीमुळे, नाकापासून कानापर्यंत जाणाऱ्या युस्टाचियन ट्यूबमध्ये समस्या उद्भवतात. त्यामुळे संसर्ग वाढतो आणि जळजळ होण्याची समस्या निर्माण होते.त्यामुळे संसर्ग होतो. कफ पूर्ण न झाल्या मुळे तीव्र वेदनांचा त्रास होतो.हिवाळ्यात असा



त्रास होत असेल तर त्यावर ताबडतोब उपचार करा, अन्यथा हा संसर्ग गंभीर रूप घेऊ शकतो. दातांच्या दुखण्यामुळे कानात दुखण्याची समस्या देखील होऊ शकते. दातांसंबंधी काही समस्या असल्यास त्वरित डॉक्टरांचा सल्ला घ्या.

**ईएनटी सर्जन सांगतात की कानात संसर्ग, कानात दुखणे, चक्कर येणे, डोकेदुखी, सूज, असामान्य स्त्राव आणि तात्पुरती श्रवणशक्ती कमी होणे ही कानाच्या संसर्गाची लक्षणे आहेत. थंड हवेच्या संपर्कात आल्यावर कान दुखणे वाढू शकते.त्यावर लवकर उपचार करा. कानात संसर्ग झाल्यास ड्रॉपचा वापर करा. डॉक्टरांनी सांगितलेले उपचार करा. डॉक्टरांचा सल्ला घेतल्यानंतर अँटीबायोटिक्स, अँटीहिस्टामाइन्स आणि वेदनाशामक औषधे घ्या.**



**– डॉ. अंकिता सोलंकी**
**वैद्यकीय तज्ञ**

# विधानसभा सार्वत्रिक निवडणूक; मतदानासाठी २० रोजी सुट्टी जाहीर

**जळगाव – भारत निवडणूक आयोगाने १५ ऑक्टोबर रोजी महाराष्ट्र राज्यातील विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ चा कार्यक्रम जाहीर केला आहे. यानुसार २० नोव्हेंबर रोजी महाराष्ट्र विधानसभा निवडणूकीचे मतदान पार पडणार आहे.**




निवडणुकीत जास्तीत जास्त लोकांना आपला मतदान हक्क बजावता यावा या करीता २० नोव्हेंबर रोजी सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. विधानसभा मतदारसंघातील मतदारांना मतदानाच्या दिवशी मतदान करण्यासाठी सुट्टी देण्यात यावी अशा सुचना कार्यसन अधिकारी शामकांत सोनवणे यांनी एका परित्रकाद्वारे दिल्या आहे.

निवडणूक होणा–या मतदान क्षेत्रातील कोणत्याही व्यवसायात, व्यापारात, औद्योगिक उपक्रमात किंवा इतर कोणत्याही आस्थापना तसेच उद्योग विभागांतर्गत येणा–या सर्व उद्योग समूह, महामंडळे, कंपन्या व संस्था, औद्योगिक उपक्रम किंवा इतर आस्थापनेमध्ये कार्यरत असलेल्या तसेच राज्याच्या विधानसभेच्या निवडणुकीत मतदान करण्याचा अधिकार असलेल्या प्रत्येक व्यक्तीला, मतदानाच्या दिवशी सुट्टी दिली जाणार आहे. सुट्टीच्या कारणास्तव कोणत्याही व्यक्तीच्या वेतनात कोणतीही कपात केली जाणार नाही. जर एखाद्या नियोक्त्याने या तरतुदींचे उल्लंघन केले, तो नियोक्ता निवडणूक आयोगाच्या नियमानुसार शिक्षेस पात्र असणार आहे.

ज्यांच्या अनुपस्थितीमुळे तो ज्या रोजगारामध्ये गुंतला आहे त्या रोजगाराच्या



संदर्भात धोका किंवा मोठ्या प्रमाणात नुकसान होऊ शकते अशा मतदाराला हे कलम लागू होणार नाही. अपवादात्मक परिस्थितीत कामगार, अधिकारी, कर्मचारी इत्यादींना पूर्ण दिवस सुट्टी देणे शक्य नसेल तर, मतदान क्षेत्रातील सुट्टी ऐवजी कमीत कमी दोन तासांची सवलत देण्यात यावी. मात्र यासाठी त्याबाबत संबंधित जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांची पूर्व परवानगी घेणे आवश्यक असणार आहे. मतदारांकडून मतदानाकरिता योग्य ती सुट्टी अथवा सवलत प्राप्त न झाल्याने मतदान करता येणे शक्य न झाल्याबाबत तक्रार आल्यास, त्यांच्याविरुद्ध योग्य कारवाई करण्यात येणार आहे.

# जळगाव महानगरपालिकेकडून मतदान जनजागृतीची सुरुवात

जळगाव – भारत निवडणूक आयोगाच्या सूचनांनुसार विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ करिता १३ जळगाव मतदार संघासाठी दिनांक २० नोव्हेंबर २०२४ रोजी होणाऱ्या मतदानासाठी,मतदान जनजागृती डतएएझ कार्यक्रमा अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रमांची सुरुवात दिनांक ८ नोव्हें. रोजी संध्याकाळी ४:३० वाजता जळगाव शहर महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीतील मनपा सभागृहात जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अंकित, महानगरपालिका आयुक्त ज्ञानेश्वर ढेरे यांच्या हस्ते व समाज कल्याण विभागाचे सहायक आयुक्त योगेश पाटील,



सहा. निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपायुक्त श्रीमती निर्मला (पेखळे), उपायुक्त श्रीमती धनश्री शिंदे , डतएएझ नोडल अधिकारी तथा उपायुक्त श्रीमती अश्विनी गायकवाड (भोसले) यांच्या उपस्थितीत करण्यात आली.

यावेळी सर्व मान्यवर अधिकारी व ,सर्व विभाग प्रमुख, सर्व शाखा अभियंता तसेच त्यांच्या अधिपत्याखालील कर्मचारी यांना मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.अंकित आणि आयुक्त तथा प्रशासक श्री ज्ञानेश्वर ढेरे यांनी प्रतिज्ञा दिली.

मी प्रतिज्ञा करतो की, मी या देशाचा